# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर.</u>

| | | |
|---|---|---|
| **जाहिरात दिनांक** | : | १६/१०/२०२६ |
| **जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक** | : | २०/१०/२०२६ |
| **अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक** | : | ०४/११/२०२६ |

---

## <u>'पुस्तक बांधणीकार' (Book Binder) या पदाकरिता जाहिरात.</u>

(१) जिल्हा न्यायालय, अहमदनगर आस्थापनेवरील **'पुस्तक बांधणीकार'** या पदाकरीता उमेदवारांची निवड यादी/प्रतिक्षा यादी तयार करण्याकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

(२) उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात शीघ्र डाक सेवा द्वारे (स्पीड पोस्ट) पोहोच पावतीसह, **<u>'पुस्तक बांधणीकार या पदाकरिता अर्ज'</u>** असे लिफाफ्यावर लिहून **<u>'प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर, न्यायनगर जवळ, डीएसपी ऑफीसच्या मागे, डीएसपी चौक, अहमदनगर ४१४ ००१'</u>** (यानंतर ज्यास संक्षेपाकरिता जिल्हा न्यायालय असे संदर्भित केले आहे) यांच्याकडे **दिनांक ०४/११/२०२६** रोजी संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यंत अथवा त्यापुर्वी पोहोचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

(३) दिनांक ०४/११/२०२६ या तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज त्याच प्रमाणे साध्या पोस्टाने पाठविलेले अर्ज आणि समक्ष आणून दिलेले अर्ज किंवा लिफाफ्यावर **'पुस्तक बांधणीकार या पदाकरिता अर्ज'** असे नमुद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(४) **पदाचे नाव :- पुस्तक बांधणीकार :-**

निवड यादीसाठी पदांची संख्या ०१.
प्रतिक्षा यादीसाठी पदांची संख्या ०१.

(५) **पदासाठी आवश्यक पात्रता :-**

उमेदवार हा :

१) माध्यमिक शालांत (S. S. C.) परीक्षा उत्तीर्ण असावा.

२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा इतर तत्सम शासन मान्यता प्राप्त संस्थेमधुन पुस्तक बांधणी बाबत कोर्स उत्तीर्ण असावा.

३) उमेदवाराला पुस्तक बांधणी बाबत तांत्रिक व व्यावसायीक माहिती असणे आवश्यक आहे.

(६) **वयोमर्यादा :-**

या जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकाच्या दिवशी उमेदवार १८ वर्षापेक्षा कमी वयाचा नसावा, सर्वसाधारण प्रवर्गाकरिता ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा व मागासवर्गीय असल्यास ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/१६-अ, दिनांक २३/०५/१९७८ नुसार शारीरिकदृष्टया अपंग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदांची कर्तव्ये पार पाडण्याकरिता सक्षम असतील तर, त्यांच्या बाबतीत सेवा प्रवेशासाठी विहित केलेली उच्च वर्यामर्यादा ४५ वर्षा पर्यंत केलेली आहे.

(७) **कामाचे स्वरूप :-**

निवड झालेल्या उमेदवारास अहमदनगर जिल्हा न्यायीक विभागांतर्गत कोणत्याही न्यायालयात **'पुस्तक बांधणीकार'** या पदावर नियुक्ती/प्रतिनियुक्ती दिली जाईल. नियुक्तीनंतर उमेदवारास न्यायालयाच्या ग्रंथालयातील पुस्तकांची बांधणी तसेच न्यायालयातील राखण्यात येणा-या फाईल्स, नोंदवहया इत्यादी ची बांधणी करणे इत्यादी कर्तव्य पार पाडावी लागतील. त्याचप्रमाणे अधिकारी यांचे निर्देशानुसार आवश्यक ती सर्व कामे करावी लागतील. पुस्तक बांधणीकार हे पद एकाकी असून, त्या पदास पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही, या बाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(८) **वेतनश्रेणी :-**

सातव्या वेतन आयोगानुसार वेतन स्तर एस-५ या सुधारित वेतन संरचेनत रूपये १८,०००- ५६९०० व नियमानुसार देय भत्ते.

(९) **उमेदवारांकरिता सुचना:-**

१) जे उमेदवार या पुर्वीच शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या-त्या विभाग/ कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेवूनच अर्ज करावा, अशी परवानगी मुलाखतीच्या वेळी सादर करावी. उमेदवारांनी आपले अर्ज आपआपल्या विभाग/कार्यालय प्रमुखामार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.

२) उमेदवाराने जर निवड प्रकियेच्या संदर्भात स्वत: किंवा कोणा मार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायीक विभागाच्या अधिका-यांना भेटण्याचा किंवा इतर गैरमार्गाचा प्रयत्न केल्यास, त्यास अपात्र ठरविण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

३) अर्जाचा नमुना व सोबतच्या प्रमाण पत्रांचे नमुने जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर अधिकृत संकेतस्थळ https://ahmednagar.dcourts.gov.in या वर उपलब्ध आहेत. **त्या नमुन्यातच अर्ज सादर करावा. अर्जासोबत नमुना अ व नमुना ब मुळ प्रतीत जोडावेत व इतर कागदपत्रांच्या स्वत: साक्षांकित केलेल्या प्रती जोडाव्यात.**

४) उमेदवाराने त्याचे/तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो) अर्जावर दिलेल्या जागी जावून त्यावर अशा प्रकारे स्वाक्षरी करावी की, स्वाक्षरीची सुरुवात छायाचित्रावर करून तिचा काही भाग छायाचित्राबाहेर येईल.

५) उमेदवाराने दोन सन्माननीय व्यक्तींनी जाहिरातीच्या तारखेनंतर दिलेले चारित्र्याचे दाखले सादर करावेत. तसेच त्याचे विरूध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला निकाली/ चालु किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणित करावे, असल्यास त्याचा तपशिल द्यावा.

६) विहित नमुन्यात नसलेला आणि अपुर्ण माहिती असलेला तसेच लिफाफ्यावर **'पुस्तक बांधणीकार या पदाकरिता अर्ज'** असे नमूद न केलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

७) पुस्तक बांधणीकार यांच्या भरती प्रक्रियेच्या वेळी जास्त प्रमाणत अर्ज प्राप्त झाल्यास योग्य ते निकष लावुन पुढील प्रक्रीयेकरिता उमेदवारांची लघुसूची तयार करण्याचे अधिकार निवड समितीस राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील व अशी तयार केलेली लघुसुची जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथील सूचना फलक व https://ahmednagar.dcourts.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तयार केलेल्या लघुसुचीबाबत कसलीही हरकत विचारत घेतली जाणार नाही.

८) पुस्तक बांधणीकार पदासाठी उमेदवारांची २० गुणांची पुस्तक बांधणी कामाची मुल्यमापन परीक्षा घेण्यात येईल.

९) पुस्तक बांधणी कामाचे मुल्यमपान परीक्षेतील गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची २० गुणांची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

१०) उमेदवारांची निवड ही पुस्तक बांधणीकार पदाच्या मुल्यमापन परीक्षा आणि तोंडी मुलाखतीत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे काटेकोरपणे गुणवत्तेनुसार केली जाईल.

११) उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करिता, परीक्षेकरीता व मुलाखतीस बोलविल्यास स्व:खर्चाने हजर रहावे लागेल.

१२) सेवाप्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात काही कारणाने बदल झाल्यास किंवा अन्य महत्वाची सूचना असल्यास त्याची माहिती जिल्हा न्यायालय, अहमदनगर कार्यालयाच्या सुचना फलकावर व https://ahmednagar.dcourts.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परंतु तो बदल वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

१३) वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परीक्षेचा दाखला सादर करणे अनिवार्य राहिल.

(१०) **महत्वाच्या सूचना :-**

१) 'नोंदणी क्रमांक' हा अर्जातील रकाना कार्यालयाद्वारे भरण्यात येईल.

२) अर्जाचा नमुना जिल्हा न्यायालय, अहमदनगर च्या https://ahmednagar.dcourts.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याप्रमाणेच असावा.

३) निवड / प्रतिक्षा यादी प्रसिध्द झाल्यापासून ती फक्त ०२ वर्षाच्या कालवधी पर्यंतच वैध राहिल.

४) ओळखपत्र असल्याशिवाय मुल्यमापन परीक्षा व मुलाखतीस हजर राहण्यास परवानगी मिळणार नाही.

५) अर्जासोबत **'नमुना - अ'** मधील प्रतिज्ञापत्र/घोषणापत्र जोडावे. तसेच **'नमुना-ब'** ही जोडावे.

६) पुस्तक बांधणीकार पदासाठी घेतलेल्या मुल्यमापन परीक्षेमध्ये मिळालेल्या एकुण गुणांच्या आधारे काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे, जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांच्या संख्येच्या ०३ (तीन) पट उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. १:३ हे गुणोत्तर राखण्यासाठी शेवटच्या उमेदवाराने मिळवलेल्या गुणांइतकेच गुण मिळवणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल.

७) लघुसुची तयार करण्याचे किंवा आवश्यक ते बदल करण्याचे अधिकारी निवड समितीने स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत.

८) लघुसुचित होण्यास पात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे जिल्हा न्यायालयाच्या https://ahmednagar.dcourts.gov.in या संकेतस्थळावर तसेच सुचनाफलकावर प्रसिध्द करण्यात येतील. पुढील चाचणीकरिता बोलावण्याबाबतची सुचना ही जिल्हा न्यायालाच्या सुचना फलकावर आणि संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाणार असल्यामुळे उमेदवारांनी **'वेळोवेळी संकेतस्थळास भेट दयावी'**. लघुसुची प्रसिध्द करतेवेळीच ओळखपत्राचा नमुना संकेतस्थळावर अपलोड केला जाईल याची नोंद घ्यावी.

९)	त्यानंतर ओळखपत्राचा नमुना उमेदवारांनी संकेतस्थळावरून डाउनलोड करून घेवून व्यवस्थित रित्या भरून आणि त्यावर आपले नविनतम पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (अर्जासोबत पूर्वी सादर केलेले) चिकटवून आणि त्यावर दिलेल्या जागी काळया शाईने स्वाक्षरी करून जिल्हा न्यायालयास दिलेल्या तारखांना सादर करावे आणि आपले प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावे. प्रवेशपत्र असल्याशिवाय मुल्यमापन परीक्षेस व मुलाखतीस हजर राहण्यास परवानगी दिली जाणार नाही.

१०)	**या कार्यालयाने या भरतीसाठी कोणतेही शुल्क आकारलेले नाही.** ही भरती पूर्णपणे विनाशुल्क आहे. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की, अर्ज दाखल करते वेळी कोणत्याही प्रकारच्या शुल्कापोटी कोणतेही दर्शनी धनाकर्ष (Demand Draft), प्रदानादेश (Pay Order), धनादेश (Cheque), इ. अर्जासोबत पाठवू नये.

सही/-
( एस. बी. कचरे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर तथा अध्यक्ष, भरती समिती,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनांक : १६/१०/२०२६

**अर्जाचा नमुना**

**जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर**

**पुस्तक बांधणीकार या पदासाठी अर्ज**

( टिप : अर्ज भरण्यापुर्वी जाहिरातीमध्ये दिलेल्या सुचना काळजीपुर्वक वाचा.)

उमेदवाराने नुकतेच काढलेले पासपोर्ट आकराचे रंगीत छायाचित्र (फोटो स्वाक्षरी सहीत)

| नोंदणी क्रमांक<br>( फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता) | A | N | G | B | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नांव : | ------------------------------------------------------------ |
| २. | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता पिनकोड सह : | ------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>पिनकोड : ------------------------------------------------ |
| ३. | भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी (असल्यास) : | ------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------ |
| ४. | सेवा योजन तसेच समाज कल्याण कार्यालय नोंदणी क्रमांक (असल्यास) : | ------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------ |
| ५. | लिंग : | पुरुष / स्त्री /इतर ---------------- |
| ६. | अर्जदार शासकीय सेवेत असल्यास, कार्यालयाचा तपशिल कार्यालयाची परवानगी घेतला आहे का ? | ------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>होय /नाही |
| ७. | जात व प्रवर्ग : | जात : ----------------- प्रवर्ग : ----------------- |
| ८. | जन्म दिनांक (अंकात) (अक्षरात) : | ---------- दिनांक ---------- महिना ---------- वर्ष -----------------<br>------------------------------------------------- |
| ९. | जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस अर्जदाराचे वय : | ---------- वर्ष ---------- महिना ---------- दिवस |

| | | |
|---|---|---|
| १०. | वैवाहिक स्थिती : | अविवाहित/ विवाहित. |
| ११. | पुस्तक बांधणी कामाचा अनुभव आहे/नाही असल्यास त्याचा तपशिल : | ----------------------------------------------------------------<br>----------------------------------------------------------------- |

**१२. शैक्षणिक अर्हता :**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | कमाल गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दहावी (एस. एस. सी.) | | | | | |
| २ | बारावी (एच. एस. सी.) | | | | | |
| ३ | पदवी | | | | | |
| ४ | पदव्युत्तर | | | | | |
| ५ | अर्जदाराने औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा इतर तत्सम शासन मान्यता प्राप्त संस्थेमधुन पुस्तक बांधणी बाबत वा/ कोर्स उत्तीर्ण केलेल्या बाबतचे प्रमाणपत्र | | | | | |

१३. दिव्यांग असल्यास : होय / नाही

अ) स्वरूप ----------------------------------------

ब) टक्केवारी ---------------------- (प्रमाणपत्रासह)

१४. इतर कामामध्ये विशेष रुची किंवा अनुभव असल्यास त्याचा तपशिल : ------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------

१५. अर्जदाराचे चारित्र्याचे दाखले दिलेल्या जबाबदार व्यक्तींची नाव, व्यवसाय व पत्ता :

१) --------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------

२) --------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------

१६. फौजदारी खटल्यांचा ----------------------------------------------------------------
तपशिल ( असल्यास) :

| अ.क्र. | प्रलंबित / निकाली / प्रस्तावित फौजदारी खटल्याचा क्रमांक | खटल्याची माहिती | निकाल झालेला असलेस निकाल तारीख |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

१७. महाराष्ट्र राज्याच्या न्याय खात्यात कार्यरत असलेल्या नातेवाईकांचा तपशिल :-

| अ.क्र. | नांव व ठिकाण | वय | पदनाम | अर्जदाराशी नाते |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो / करते की, मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषित केलेले नाही. मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्याविरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही.

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो /करते की, अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही बाब खोटी / चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासुन अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड / नेमणूक झाल्यास, माझी सेवा कोणत्याही नोटीस शिवाय समाप्त केली जाईल, याची मला जाणीव आहे.

तसेच दिनांक २८ मार्च २०२५ नंतर जन्मलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असल्यास मला सदर पदावरुन अपात्र ठरविण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक : / /२०२६ अर्जदाराचे संपूर्ण नांव व सही

**अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे :-**

| | |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |

| | |
|---|---|
| ४. | |
| ५. | |
| ६. | |
| ७. | |
| ८. | |
| ९. | |
| १०. | |
| ११. | |
| १२. | |
| १३. | |

दिनांक :     /     /२०२६                                        अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही.

## नमुना अ

## प्रतिज्ञापत्र / घोषणापत्र

मी अर्जदार ------------------------------------------------- याद्वारे प्रतिज्ञापुर्वक जाहिर करतो/ करते की, मला कधीही अटक झालेली नाही. तसेच माझे विरुध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरविलेले नाही किंवा कोणतीही शिक्षा ठोठावलेली नाही.

**( अर्जदार राज्य / केंद्र शासन कर्मचारी असल्यास)**

मी अर्जदार ------------------------------------------------- याद्वारे प्रतिज्ञापुर्वक जाहिर करतो / करते की, माझे विरुध्द कोणतीही शिस्तभंगाची चौकशी प्रलंबित नाही किंवा / तसेच मला कोणत्याही शिस्तभंगाच्या चौकशीत दोषी ठरवण्यात आलेले नाही.

मी अर्जदार ------------------------------------------------- याद्वारे प्रतिज्ञापुर्वक जाहिर करतो / करते की, मला आज दिनांक / /२०२६ रोजी ------- अपत्ये आहेत. त्यापैकी ------- इतकी अपत्ये दिनांक २८ मार्च, २००५ नंतर म्हणजेच दिनांक / / (त्या अपत्याची जन्मतारीख येथे नमुद करावी) रोजी जन्माला आले आहे.

दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असल्यास, मी निवड प्रक्रियेतुन कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविला जावू शकतो / शकते, याची मला जाणीव आहे.

जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व सुचना व अटी मला मान्य आहेत.

स्थळ : अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी

दिनांक : / / २०२६ ( ---------------------------------)

**टिप - अर्जदार अविवाहीत असल्यास त्याने वरील प्रतिज्ञापत्र/ घोषणात्र आवश्यक त्या ठिकाणी लागू नाही असे नमुद करावे.**

## <u>नमुना ब</u>

## <u>चारित्र्य (वर्तुणक) प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती/ कुमारी --------------------------------हे / हया ------------------------ तालुका -------------------- जिल्हा -------------येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील -------- वर्षापासुन ओळखतो. त्यांची वर्तणुक व चारित्र्य चांगले आहे. ते / त्या माझे / माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरील वतुर्णक / चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे / दिले आहे.

...................................

प्रमाणपत्र देणा-याचे नाव व सही

पत्ता : ..................................................

...........................................................

...........................................................

भ्रमणध्वनी क्रमांक : .................................

स्थळ :

दिनांक : / / २०२६